**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**सोमवार, दिनांक : १५ एप्रिल, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **नवीन तंत्रज्ञानामुळं करव्यवस्थेत सुधारणा होत असून करचोरी रोखण्यास मदत होत आहे: उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी नागपूर इथं प्रतिपादन.**

2. **पहिल्या टप्प्याच्या निवडणुकीसाठी सर्वपक्षीय प्रचाराला वेग.**

3. **भाजपचा जाहीरनामा रोजगार निर्मितीला समर्पित असल्याचं भाजपचे वरिष्ठ नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.**

**आणि**

4. **सर्वाधिक मतदान करणाऱ्या सोसायटींना मिळणार पुरस्कार- नागपूर मनपा आणि जिल्हा निवडणूक कार्यालयाची अभिनव स्पर्धा.**

**######**

**जगदीप धनखड**

कृत्रिम तंत्रज्ञान आणि प्रगत विश्लेषण प्रणाली यांसारख्या नवीन तंत्रज्ञानामुळं करप्रणालीमध्ये सुधारणा होत असून करचोरी रोखण्यास मदत होत आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज केलं. नागपुरातील राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी - NADT इथं भारतीय राजस्व सेवेच्या ७६ व्या बॅचच्या सेवापूर्व प्रशिक्षणाच्या समापन सत्राला ते संबोधित करत होते. नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळं कर दात्यांचा संबंधित व्यवस्थेवरील विश्वास वाढतो, ज्यामुळं नियमित कर भरण्यास प्रोत्साहन मिळतं, असंही धनखड म्हणाले. यावेळी राज्यपाल रमेश बैस आणि सेंट्रल बोर्ड ऑफ टॅक्सेस-सीबीडीटीचे अध्यक्ष नितीन गुप्ता देखील उपस्थित होते.

याप्रसंगी उपराष्ट्रपतींच्या हस्ते लॉ ऑफ गव्हर्नन्स, राजभाषा, ॲडव्हान्स अकाऊंटींग, बिझनेस लॉ या विषयांमध्ये प्राविण्य प्राप्त करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीमध्ये भारतीय राजस्व सेवेतील ७६ व्या तुकडीत एकूण ५८ अधिकारी असून यापैकी २४ महिला अधिकारी आहेत.

**धनंजय चंद्रचूड**

देशात न्यायव्यवस्थेवर दडपण आणण्याचा, तसंच न्यायव्यवस्थेबद्दल चुकीची माहिती पसरवण्याचा आणि जनतेच्या भावना भडकवण्याचा प्रयत्न होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करणारं पत्र २० सेवानिवृत्त न्यायमूर्तींनी सरन्यायाधीशांना लिहिलं आहे. कोत्या राजकीय हेतूनं अल्पकालीन फायद्यासाठी वेगवेगळ्या मार्गांनी न्यायालय आणि न्यायाधीशांच्या प्रामाणिकपणाविषयी तसंच हेतूविषयी संदेह निर्माण करण्याचं काम हे घटक करीत असून न्यायाधीशांच्या निस्पृहता आणि निःपक्षपातीपणावर हा उघड हल्ला असल्याचं

या पत्रात म्हटलं आहे. अशा घटकांपासून देशाच्या न्यायव्यवस्थेचं आणि न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेचं रक्षण करण्यासाठी पावलं उचलावीत, असं आवाहन या पत्रात सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना केलं आहे.

**प्रचार : प्रमोद सावंत - पत्र परिषद नागपूर, फडणवीस**

पहिल्या टप्प्यातील निवडणूक प्रचार शिगेला पोचला असून राजकीय पक्षांनी प्रचारसभांचा धडाका लावला आहे. आज दुपारी तुमसर इथं भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघाचे उमेदवार सुनील मेंढे यांच्या प्रचारासाठी देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारसभेला संबोधित केलं. देशात 25 कोटी लोक गरिबीरेषेच्या वर आले असून 60 कोटी लोकांच्या घरी पिण्याचं शुध्द पाणी आमच्या सरकारनं पोहचवलं आहे, असं प्रतिपादन फडणवीसांनी यावेळी केलं.

याशिवाय नागपूर शहरात भाजपचे नितीन गडकरी आणि कॉंग्रेसचे विकास ठाकरे यांचा शहराच्या विविध भागात संस्था, संघटना आणि समुदायांसोबत जनसंपर्क सुरू आहे.

दरम्यान नारी शक्ति, युवा शक्ति, किसान शक्ति आणि गरीब कल्याण या चार बाबींवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेषत्वानं भर दिला आहे. समाजाच्या शेवटच्या घटकाला लाभ मिळावा, या दृष्टीनं काम करण्यात आल्याचं प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री आणि भाजपा नेते प्रमोद सावंत यांनी नागपुरात केलं. ते पत्रकार परिषदेला संबोधित करीत होते.

**दिनेश शर्मा**

2014 पासून देशात सातत्यानं विकास सुरू आहे. अनेक महत्त्वाचे प्रकल्प, देशात आलेली मोठी गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाला मिळालेलं स्थान या आधारावर आम्ही निवडणूक लढवत आहोत. मात्र कॉंग्रेस पक्ष हा लोकांमध्ये संविधान बदलण्याची भीती दाखवून मताचं राजकारण करत असल्याची टीका भाजपचे महाराष्ट्राचे प्रभारी आणि उत्तर प्रदेशचे माजी उप-मुख्यमंत्री दिनेश शर्मा यांनी आज अमरावती इथं केली.

अमरावती लोकसभे संदर्भात त्यांनी बूथ प्रमुख, शक्ती प्रमुख, पन्ना प्रमुख आणि सुपर वॉरियर्स या श्रेणीतील कार्यकर्त्यांच्या बैठकीसाठी ते आज अमरावतीत आले होते. यावेळी त्यांनी आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत माध्यमांसोबत संवाद साधला.

**गृह मतदान**

लोकसभा निवडणुकीत प्रथमच ८५ वर्षांहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना आणि दिव्यांग मतदारांना घरून मतदान करण्याची मुभा देण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यात कालपासून गृह मतदानाला नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघातून सुरुवात झाली. नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघातील डायमंड नगर इथले रहिवासी ज्येष्ठ नागरिक वसंत ढोमणे यांनी सर्वप्रथम आपला गृह मतदानाचा हक्क बजावला.

नागपूरसाठी निवडणूक विभागातर्फे 160 चमू तयार करण्यात आल्या असून यात 480 अधिकारी-कर्मचा-यांचा समावेश आहे, तर रामटेक लोकसभा मतदारसंघासाठी 105 चमू तयार करण्यात आल्या असून यात 315 अधिकारी - कर्मचा-यांचा समावेश आहे. कुठल्याही प्रकारे मतदाराच्या मतदानाच्या गोपनीयतेचा भंग होणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचना संबंधित कर्मचा-यांना जिल्हा निवडणूक विभागामार्फत देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, वाशिम जिल्ह्यातल्या यवतमाळ-वाशिम आणि अकोला लोकसभा मतदारसंघांमध्ये ही प्रक्रिया सुरू झाली असून रिसोड, कारंजा विधानसभा मतदार संघातल्या एकूण ८११ वयोवृद्ध आणि दिव्यांगांनी गृह मतदान केलं. वाशिम विधानसभा मतदारसंघात ही प्रक्रिया १९ आणि २० एप्रिलला होणार आहे.

**तृतीयपंथी मतदार**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत तृतीयपंथी मतदारांच्या संख्येत दुपटीपेक्षा अधिक वाढ झाली असून, ठाण्यात सर्वाधिक तृतीयपंथी मतदारांची नोंद झाली आहे. २०१४ च्या निवडणुकीदरम्यान पहिल्यांदाच पुरुष मतदार, महिला मतदारांबरोबरच 'तृतीयपंथी' अशी तिसरी वर्गवारी करण्यात आली होती. राज्याच्या एकूण मतदार संख्येत सध्या पाच हजार ६१७ तृतीयपंथी मतदार आहेत. ठाण्यात एक हजार २७९, मुंबई उपनगरमध्ये ८१२, पुण्यात ७२६ तृतीयपंथी मतदारांची नोंद झाली आहे. तृतीयपंथी कार्यकर्ते गौरी सावंत, प्रणित हाटे आणि झैनाब पटेल हे निवडणूक सदिच्छादूत म्हणून काम करणार आहेत.

**मतदार जनजागृती दौड**

आगामी लोकसभा निवडणुकीत जिल्हयातील मतदानाचं प्रमाण वाढून मिशन डिस्टींक्शन यशस्वी व्हावं, यासाठी आज सकाळी 6 वाजता रन फॉर डिस्टिंक्शन या मतदार जनजागृती दौडचं आयोजन करण्यात आलं होतं. 1, 3,5 आणि 10 किलोमीटर या चार प्रकारात या धावण्याच्या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं. कस्तुरचंद पार्क येथून ही मॅरेथॉन सुरू झाली. जिल्हयातील विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह मोठ्या संख्येत मतदार यात सहभागी झाले होते.

**मोदी वर्धा सभा**

वर्धा जिल्ह्यातील आर्वी तहसीलच्या तळेगाव इथं शुक्रवार दिनांक १९ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यातील प्रचारसभेला पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी संबोधित करणार आहेत. महायुतीचे वर्धा मतदार संघाचे उमेदवार खासदार रामदास तडस यांच्या प्रचारार्थ ही सभा असेल.

**देवेंद्र फडणवीस पत्र परिषद**

भारतीय जनता पक्षानं जाहीर केलेला जाहीरनामा हा सर्व समाज घटकांसाठी असून मनुफॅक्चरिंग क्षेत्राचा विकास, स्टार्टअप परिसंस्थेचा विकास, डिजिटल पायाभूत सुविधा निर्मिती या माध्यमातून रोजगार निर्मितीला समर्पित असा हा जाहीरनामा असल्याचं प्रतिपादन भाजपचे वरिष्ठ नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूरमध्ये केलं. काल भाजपतर्फे निवडणूक जाहीरनामा जाहीर करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी आज नागपुरात पत्रकार परिषद घेतली, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. रिक्त शासकीय जागा भरण्याचा आणि रोजगार संधी निर्माण करण्याचा निर्धार देखील त्यांनी बोलून दाखविला. कॉंग्रेसशासित राज्यांत त्यांनी जाहीरनाम्यातील एकही आश्वासन पूर्ण केलं नसल्याचा आरोप फडणवीस यांनी यावेळी केला.

**सर्वाधिक मतदान पुरस्कार**

यंदाच्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सर्वाधिक मतदान करणा-या सोसायटींना पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. नागपूर महानगरपालिका आणि नागपूर जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीनं सोसायटींसाठी विशेष स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेच्या अनुषंगानं आज कविवर्य सुरेश भट सभागृहामध्ये रहिवासी सोसायटींच्या प्रतिनिधींनी मतदानाची शपथ घेतली.

मतदार यादीत  नाव शोधणं तसंच मतदान बुथ शोधण्यासाठी वोटर सर्चिंग ॲपचा उपयोग करणं, तसंच 8600004746 या  क्रमांवर  पूर्ण  नाव  आणि पत्ता  व्हाट्सॲप  करण्याचं आवाहन सहायक आयुक्त महेश धामेचा यांनी यावेळी  केलं.

नागपूर महानगरपालिका आणि नागपूर जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीनं शहरातील फ्लॅट, अपार्टमेंट, हाउसिंग सोसायटींसाठी तीन गटात मतदार स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये ५०, ५० ते १०० आणि  १०० पेक्षा जास्त कुटुंब संख्या असलेल्या सोसायटी- असे स्पर्धेसाठी तीन गट करण्यात आलेले आहेत. प्रत्येक सोसायटीतील मतदार यादीत नाव  असलेल्या १८ वर्षांवरील व्यक्तींनी मतदान करणं अनिवार्य आहे. स्पर्धेमध्ये  नोंदणी करण्यासाठी मनपा आणि जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत  गुगल लिंक आणि क्यूआर कोड तयार करण्यात आले आहेत. यावर नोंदणी  करताना अडचण निर्माण झाल्यास sveepngp2024@gmail.com या ई-मेल आयडीवर अडचण नोंदवावी आणि जास्तीत जास्त सोसायटींनी स्पर्धेत सहभागी व्हावं, असं आवाहन मनपा आणि जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आलं  आहे.

**उष्माघाताचे रुग्ण**

बुलडाणा जिल्ह्यात दिवसेंदिवस उष्णतेचं प्रमाण वाढत असून, जिल्हाभरात एकूण १२ उष्माघाताचे रुग्ण आढळले आहेत. उष्माघात बाधितांसाठी उपजिल्हा रुग्णालयात विशेष कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

**हवामान**

नागपूरसह पूर्व विदर्भातील सर्व जिल्ह्यांत  या आठवड्यात पावसाचा अंदाज नसून हवामान कोरडं राहणार आहे. दरम्यान, अवकाळी पावसाचा जोर ओसरल्यानं कमाल तापमानात ३ ते ५ अंशाची वाढ होण्याची शक्यता आहे. पश्चिम विदर्भात यवतमाळ वगळता अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम या जिल्ह्यात आज पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, विदर्भात मंगळवार ते गुरुवार या तीन दिवसांत तब्बल साडेसात हजार हेक्टरवरील पिकांचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागानं व्यक्त केला आहे.

**उन्हाळी सुट्ट्या विशेष गाडी**

नागपूर-पुणे उन्हाळी सुट्ट्या विशेष गाडी आतापर्यंत द्वै-साप्ताहिक फेऱ्या करत होती, परंतु प्रवाश्यांची वाढती गर्दी पाहता ही गाडी आता आठवड्यातून तीन वेळा अर्थात त्रै -साप्ताहिक करण्यात आली आहे. 01165 क्रमांकाची ही गाडी येत्या 13 जून पर्यन्त चालविण्यात येणार आहे.

**######**